**पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे**

# मामासाहेब मोहोळ महाविद्यालय,

**पौड रोड, पुणे- ३८**

---

## अहवाल-2023-24

# अर्थशास्त्र विभाग

शैक्षणिक वर्ष 2023-24 मध्ये अर्थशास्त्र विभागात द्वितीय वर्ष कला या वर्गात एकूण 37 विद्यार्थी प्रवेशित असून तृतीय वर्ष कला या वर्गात 31 विद्यार्थी प्रवेशीत आहेत पदव्युत्तर विभागात एम ए भाग 1 आणि भाग 2 मिळून एकूण 12 विद्यार्थी प्रवेशित आहेत.

पदवी व पदव्युत्तर विभागातील विद्यार्थ्यांना अर्थशास्त्र या विषयाची सखोल व अदययावत माहिती मिळावी यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे उपक्रम विभागाच्या वतीने राबविण्यात आले.

**1)जागतिक लोकसंख्या दिन:** दिनांक 11 जुलै 2023 रोजी जागतिक लोकसंख्या दिन साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने वाढत्या लोकसंख्येचे परिणाम या विषयावर प्राचार्य डॉ. जी. पी सातव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा डॉ मेघना भोसले यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले डॉ. आदिनाथ पाठक यांनी कार्यक्रमाची रूपरेषा मांडली . प्रा. लक्ष्मण उकिर्डे यांनी आभार मानले. सदर कार्यक्रमासाठी अर्थशास्त्र विभागातील प्रा. गणपत शेळके ,प्रा. कुमुदिनी पाटील ,प्रा. दिपाली फड व विद्यार्थी उपस्थित होते.

**2) शिक्षक दिन :** दि 05 सप्टेंबर 2023 रोजी महाविद्यालयात अर्थशास्त्र विभाग व सांस्कृतिक विभाग यांच्या वतीने डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्म दिन हा "शिक्षक दिन" म्हणून साजरा करण्यात आला. तसेच या दिवशी "अर्थांकुर" शीर्षकाखाली अर्थशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भित्तिपत्रकाचे अनावरण प्राचार्य डॉ. जी. पी सातव यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा डॉ मेघना भोसले यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले डॉ.आदिनाथ पाठक यांनी कार्यक्रमाची रूपरेषा मांडली.प्रा. लक्ष्मण उकिर्डे यांनी आभार मानले. सदर कार्यक्रमासाठी अर्थशास्त्र विभागातील प्रा.गणपत

शेळके, प्रा.कुमुदिनी पाटील ,प्रा.दिपाली फड तसेच या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग व शिक्षकेतर कर्मचारी  व विद्यार्थी उपस्थित होते.

**3) वित्तीय साक्षरता दिन:** दि. 21 सप्टेंबर 2023  रोजी साक्षरता दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. आधुनिक काळात वित्तीय साक्षरता हि अत्यंत महत्वाची असून विद्यार्थांना त्याची माहिती आणि महत्व या विषयाची सखोल ओळख होण्यासाठी प्रा. दिलीप मुंजाळयांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. प्रा. दिलीप मुंजाळ यांनी विद्यार्थ्यांना वित्तीय साक्षरतेचे महत्व या विषयावर मार्गदर्शन केले. अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा डॉ मेघना भोसले यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले डॉ. आदिनाथ पाठक यांनी प्रमुख वक्त्यांची ओळख करून दिली. प्रा. गणपत शेळके यांनी आभार मानले. सदर कार्यक्रमासाठी अर्थशास्त्र विभागातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

**4) इंटर्नशिप मार्गदर्शन-** तृतीय वर्ष वाणिज्य या वर्गातील विद्यार्थ्यांना बँकिंग या विषयाकरिता इंटर्नशिप ही सक्तीची असून प्रत्येक विद्यार्थ्याला त्या बाबतची सखोल माहिती मिळावी यासाठी शाहू महाविद्यालयाच्या प्रा. नेहा नलावडे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. या व्याख्यानासाठी ६२ विद्यार्थी उपस्थित होते. या व्याख्यानाचे आयोजन बैंकिंग विषयाचे प्रा उकिर्डे एल जी. आणि प्रा. गणपत शेळके यांनी केले.

**४) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन:** 11 ऑक्टोबर 2023 रोजी अर्थशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांना बँकिंग, एमपीएससी, सेट, नेट इत्यादी स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन मिळावे यासाठी प्रा. कुमुदिनी पाटील, प्रा.गणपत शेळके यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. ,प्रा.कुमुदिनी पाटील यानी विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या स्पर्धा परीक्षांच्या बाबतची माहिती आणि त्यांची पूर्वतयारी याबाबतचे मार्गदर्शन केले. प्रा. गणपत शेळके यांनी विद्यार्थ्यांना प्राध्यापक होण्यासाठी आवश्यक असलेल्या सेट व नेट परीक्षांची माहिती दिली.

**५) संशोधन मार्गदर्शन**: 12 फेब्रुवारी 2024 रोजी  द्वितीय वर्ष कला आणि एम ए अर्थशास्त्र भाग २ या वर्गातील विद्यार्थ्यांना संशोधन पद्धती हा विषय अभ्यासासाठी असून, त्या विषयाचे सखोल मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळावे यासाठी प्रा डॉ. एम. जी. मुल्ला याचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. विद्यार्थ्याना संशोधनाची ओळख व आवड निर्माण व्हावी याकरिता हे व्याख्यान उपयुक्त ठरले.

वरील सर्व कार्यक्रमाचे आयोजन अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. मेघना भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.